क्रमांक: पीटीआय-२०९१/६४५१५/[२०३६]/तांशि-२.
शिक्षण व सेवायोजन विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २ सप्टेंबर, १९९१.

प्रति,

जनरल सेक्रेटरी,
महात्मा गांधी विद्यामंदिराचे,
इन्स्टिट्यूट ऑफ इंडस्ट्रियल
ॲण्ड फार्मास्युटिकल टेक्नॉलॉजी,
पंचवटी, जि. नाशिक.

विषय :- अशासकीय संस्थांना विना अनुदान तत्वावर हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरिंग टेक्नॉलॉजी पदविका अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता...

महोदय,

हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरिंग टेक्नॉलॉजी पदविका अभ्यासक्रम सुरु करण्यासंबंधात आपण संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई-१ यांना केलेल्या अर्जासंदर्भात आपणांस कळविण्यात येते की, आपल्या संस्थेस, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मान्यतेच्या अधिन राहून सन १९९१-९२ या शैक्षणिक वर्षापासून विना अनुदान तत्वावर हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरिंग टेक्नॉलॉजी हा पदविका अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी खालील अटींवर परवानगी देण्यात येत आहे :-

[अ] शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग, क्रमांक: टिईएम-३३८२/१११८३६/[१९०]/तांशि-१[अ], दिनांक २१ मे, १९८३ अन्वये अशा संस्थांना परवानगी देण्यासाठी शासनाने विहित केलेल्या अटी व शर्ती आपणांस मान्य असतील [सदर शासन निर्णयाची प्रत सोबत जोडली आहे.]

[ब] सुरु करावयाचा पदविका अभ्यासक्रम तंत्रशिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची मान्यता घेऊन निश्चित केला जाईल.

[क] वरील [अ] व [ब] मध्ये अंतर्भूत असणारी कागदपत्रे व औपचारिक बाबी आपल्या संस्थेद्वारे तंत्र शिक्षण संचालकांच्या सहमतीने, समाधानकारकरित्या पूर्ण करण्यात येतील व त्यानंतरच अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी अंतिम परवानगी व दिनांक तंत्र शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून देण्यात येईल.

२...

(ड) या अभ्यासक्रमात [illegible]
यांची मान्यता मिळविण्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेवर

२. तेव्हा आपणांस विनंती करण्यात येते की, आवश्यक त्या सर्व औपचारिक बाबी पूर्ण करण्यासाठी आपण त्वरीत तंत्रशिक्षण संचालक, महाराष्ट्र, ३, महापालिका मार्ग, मुंबई-१ यांच्याशी संपर्क साधावा. तसेच आपणांस सूचित क येते की, तंत्रशिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी लेखी स्वरूपात अंतिम परवानगी दिल्याशिवाय आपण अभ्यासक्रमात प्रवेश देऊन सुरुवात करू नये.

आपला विश्वासू,

[signature]

[ श्री० सी० शहाणे ]

अवर सचिव, महाराष्ट्र शासन